**रे. मु. क्र.८१/२००७**
**ज्ञानेश्वर घाटे वगैरे विरुध्द दिनकर घाटे वगैरे**
CNR No. MHPU-13000357-2007

## निशाणी क्र. ३८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांना दाव्यात वादी म्हणून हस्तांतरित (Transposition) करण्यात यावे यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादी क्र. २ चे म्हणणेनुसार, प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप, कब्जा व इतर मागणीसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची ताबे वहिवाट असून त्यांचा अविभक्त हिस्सा आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांनी दि.११/०८/२०२१ रोजी न्यायालयात त्यांच्या पुरता दावा काढून घेणेसाठी अर्ज केलेला होता. सदर अर्ज न्यायालयाने मंजुर केलेला आहे. वादी क्र. १ हे सदर दावा चालविण्यात स्वारस्य दाखवत नाहीत व त्यांनी सन २०१२ पासून दाव्यात कोणतीही आवश्यक तजवीज केलेली नाही. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांचा अविभक्त हिस्सा आहे. सबब, प्रतिवादी क्र. २ यांना वादी म्हणून हस्तांतरित करणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

**३.** प्रतिवादीने अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र. १ व २ यांना सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून हस्तांतरित करुन प्रतिवादी क्र. २ यांना सदर दाव्यामध्ये वादी म्हणून हस्तांतरित करुन दावा चालविण्यास परवानगी मिळावी. त्यासाठी प्रतिवादी क्र. २ त्यांच्या हिश्श्याचा मुद्रांक शुल्क भरणेस तयार आहेत. सदर हस्तांतरणामुळे वादी व प्रतिवादी यांच्या हक्क व अधिकारमध्ये बदल होत नाही. तसेच वादी व इतर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, दावा मिळकतीमध्ये प्रत्येकाचा अविभक्त हिस्सा पृथ्थक करुन मिळणेकामी सदरचा अर्ज मंजुर होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**४.** वादी यांना पुरेशी संधी देवून देखील कोणतेही म्हणणे दिलेले नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज प्रतिज्ञापत्रासोबत दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, प्रस्तुत दावा वाटप, कब्जा व इतर मागणीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर वादीने कोणतेही म्हणणे दिलेले नाही त्यामुळे अर्जातील प्रतिवादी क्र. २ चे कथन अविवादीत आहे. अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांनी दि. ११/०८/२०२१ रोजी दाव्यातून त्यांचे नाव कमी करण्याची पुरशिस दिलेली आहे व त्या अनुषंगाने त्यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात आलेले आहे. प्रस्तुत दावा सन २००७ पासून प्रलंबित आहे. परंतु, दाव्यातील वादी यांनी दावा चालविण्यासाठी कोणतीही तजवीज केलेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांना वादी म्हणून हस्तांतरित करण्याची विनंती संयुक्तिक स्वरुपाची दिसून येते. परंतु, प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्यातील वादी क्र १ व २ यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून हस्तांतरित करण्याची विनंती केलेली आहे. दाव्यातील वादी क्र. २ चे नाव यापुर्वीच कमी झालेले आहे. प्रस्तुत अर्जावर वादी क्र. १ यांनी कोणतेही म्हणणे दिलेले नाही. अशा परिस्थितीत वादी यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून हस्तांतरित करणे योग्य होणार नाही. प्रतिवादी क्र. २ यास वादी म्हणून हस्तांतरित केल्यास इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषावर निर्णित करण्यासाठी वादीची मागणी मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. २ चा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्यात हजर राहून दाव्यात योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**सही/—**

**(श्रीमती डी. एम. पाटील)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

सासवड.

सासवड

दिनांक—२३/१२/२०२१

**-: C E R T I F I C A T E :-**

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R. Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, 2$^{nd}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 23/12/2021 |
| Order signed by presiding officer on | : | 23/12/2021 |
| Order uploaded on | : | 24/12/2021 |